

कोल्हापूर : 'एनसीसी'तर्फे कुलगुरूंना पत्र देताना ब्रिगेडियर आर. के. सिंग. शेजारी कर्नल शहा, मेजर प्रा. डॉ. रूपा शहा आदी.

# एनसीसी अधिकाऱ्यांकडून कुलगुरूंची भेट

**कोल्हापूर** : क्रीडा विभागाशी समन्वय ठेवून छात्र सैनिकांसाठी शूटिंग रेंज व अडथळा शर्यतीचे मैदान करता येणे शक्य असल्याचे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले. एनसीसीच्या छात्र सैनिकांसाठी अडथळा शर्यतीचे मैदान व शूटिंग रेंज विकसित करण्याचे काम शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा विभागाशी समन्वय ठेवल्यास लवकर मार्गी लागू शकेल, अशी ग्वाही कुलगुरूंनी दिली. एनसीसी कोल्हापूरच्या गट मुख्यालयाचे प्रमुख ब्रिगेडियर आर. के. सिंग यांच्याशी त्यांची चर्चा झाली. या वेळी ते बोलत होते. ब्रिगेडियर सिंग यांनी कुलगुरूंची भेट घेऊन शुभेच्छा दिल्या. या वेळी त्यांनी एनसीसीतर्फे मानद कर्नल पदाचा सन्मान करण्याचे पत्र कुलगुरूंना दिले. ब्रिगेडियर सिंग यांच्या समवेत कोल्हापूर गट मुख्यालयाचे प्रशासन अधिकारी कर्नल राजेश शहा, ट्रेनिंग ऑफिसर कर्नल सुनीलकुमार जी. आर. आणि ऑनररी मेजर प्रा. डॉ. रुपा शहा उपस्थित होते.



एन.सी.सी. कोल्हापूर गटमुख्यालयाचे प्रमुख ब्रिगेडिअर आर. के. सिंग यांनी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी गटमुख्यालयाचे प्रशासनाधिकारी कर्नल राजेश शाह, प्रशिक्षण अधिकारी कर्नल सुनीलकुमार जी. आर., मानद मेजर प्रा. डॉ. रुपा शहा, आदी मान्यवर उपस्थित होते.

# मैदानासह शूटिंग रेंजचा प्रश्न मार्गी लागेल

## डी. टी. शिर्के : 'एनसीसी' बरोबर चर्चा

■ लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : एनसीसीच्या छात्रसैनिकांसाठी अडथळा शर्यतीचे मैदान व शूटिंग रेंज विकसित करण्याचे काम शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा विभागाशी समन्वय ठेवल्यास लवकर मार्गी लागू शकेल, अशी ग्वाही शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी एन. सी. सी. कोल्हापूर गटमुख्यालयाचे प्रमुख ब्रिगेडिअर आर. के. सिंग यांच्याशी झालेल्या चर्चेदरम्यान शनिवारी दिली.

छात्रसैनिकांच्या सराव व प्रशिक्षणासाठी अनेक वर्षांपासून अडथळा शर्यतीचे मैदान व शूटिंग रेंज विकसित करण्याची मागणी प्रलंबित आहे. ही बाब चर्चेदरम्यान सिंग यांनी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या निदर्शनास आणून दिली. यावर कुलगुरू डॉ. शिर्के यांनी या बाबी विकसित केल्या जाऊ शकतात. तसे केल्यास त्याचा उपयोग छात्रसैनिकांनाही होऊ शकतो, असे सांगत प्रश्न सोडविण्यासाठी सकारात्मक भूमिका घेतली. एनसीसीच्या वतीने मानद कर्नल पदाचा सन्मान कुलगुरूंना प्रदान करण्याचा इरादा व्यक्त करणारे पत्रही यावेळी सुपूर्द केले. यावेळी प्रशासनाधिकारी कर्नल राजेश शाह, प्रशिक्षण अधिकारी कर्नल सुनीलकुमार जी.आर., मानद मेजर प्रा. डॉ. रूपा शहा, आदी उपस्थित होते.

# -शिवाजी विद्यापीठात शहिदांना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात संविधान दिन आणि शहीद दिन या निमित्ताने भारतीय संविधानकर्ते आणि वीर शहीद जवान यांच्या पवित्र स्मृतींना गुरुवारी अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित होते.

# १ डिसेंबरला विशेष नैमित्तिक रजा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने १ डिसेंबर रोजी पदवीधर व शिक्षक मतदार संघ निवडणुकीच्या मतदानासाठी मतदारांना विशेष नैमित्तिक रजा मंजूर करण्यात आली आहे. याबाबतचे परिपत्रक कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी संलग्नित महाविद्यालये व अधिविभागांना काढले आहे.

**पदवीधर, शिक्षक निवडणूक**

केंद्रीय निवडणूक आयोगाने २ नोव्हेंबरच्या पत्रकाद्वारे विधान परिषदेच्या पदवीधर व शिक्षक मतदारसंघाचा निवडणूक कार्यक्रम घोषित केला आहे. त्यानुसार मंगळवार १ डिसेंबर रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत मतदान होणार आहे. राज्य सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाच्या निर्णयानुसार निवडणुकीसाठी मतदार असलेल्या पदवीधर, शिक्षक मतदारांना निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी मतदानाच्या दिवसाची विशेष नैमित्तिक रजा देणे आवश्यक आहे. त्यानुसार मतदारांना मतदानाच्या दिवसाची विशेष नैमित्तिक रजा मंजूर करण्यात येत आहे, असल्याचे कुलसचिवांनी परिपत्रकात म्हटले आहे.